# पालकमंत्री अजितदादा बीड जिल्ह्यात खाजगी बँकेमुळे अनेकांचे घरे उद्धवस्त..!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

## “ दादा एकदा होऊनच जाऊ द्या, खासगी बँकांचा आढावा घ्या, खातेदारावर आत्महत्या करण्याची वेळ?

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – १९३ ■ मंगळवार दि.१ एप्रिल २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 193 ■ Tuesday Dt. 1 April 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# बीड जिल्ह्यात सहा आमदार दोन खासदार तरीही ठेवीदारांच्या आयुष्याचा अंधार ?

## बीड जिल्ह्यातील सहकार क्षेत्र धोक्यात; ठेवीदारांची चिंता वाढली? ठेवीदारांच्या हक्कांसाठी लढा देणारे सुरेश धस हिरो ठरले!

## गेवराई व बीडच्या नवख्या आमदारांनी मतदारसंघातील ठेवीदारांचे प्रश्न: शासन दरबारी मांडावे

## खाजगी बँक चालकासह संचालक मंडळाच्या प्रॉपर्टीवर ताबा करा?

## आर्थिक गुन्हेगारी रोखण्यासाठी राज्यातील प्रत्येक पोलीस स्टेशनला सहकार मदत कक्ष स्थापन करणे गरजेचे?





बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात खाजगी बँकांचा सुळसुळाट पाहायला मिळाला. नवीन नवीन खातेदारांना तसेच नागरिकांना आमीष दाखवून, खातेदारांच्या लाखो रुपयांची रक्कम गुंतवणूक करून स्वतःचा फायदा करून घेतला आहे. यामुळे बीड जिल्ह्यातील बहुतांश खातेदार अडचणीत आले आहेत. तसेच अनेकांनी आत्महत्या देखील केलेले आहेत. कबाड कष्ट करून जवळ असलेली रक्कम खाजगी बँकात ठेवून खातेदारांनी स्वतःची झोळी रिकामी केली आहे. आता त्या बँका काही फरार देखील झालेले आहे. तसेच यामुळे खातेदारांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे. हा प्रश्न अत्यंत गंभीर असून याकडे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांनी विशेष लक्ष देण्याची गरज आहे. कारण अजूनही अनेक बँका फरार होण्याच्या मार्गावर आहेत. यामुळे खातेदारांमध्ये निर्माण होत आहे. तसेच जिल्हा प्रशासनाने देखील याकडे गांभीर्याने लक्ष देऊन खातेदारांना न्याय द्यावा अशी मागणी खातेदार वर्ग करत आहे.

पान २ वर










# दगडवाडीतील १४० एकर जमीन हडपण्याच्या प्रयत्नाविरोधात गावकऱ्यांचे आंदोलन

## तीन महिलासह पाच तरुणांनी घेतले अंगावर डिझेल ओतून

## दगडवाडी येथील ग्रामस्थांचं १४० एकर जमिनीसाठी सामुदायिक आत्मदहन!

## पोलीस निरीक्षकासह तहसीलदार घटनास्थळी भेट

## तहसीदारांचं गावकऱ्यांना लेखी आश्वासन!

## मंत्रालयातील कर्मचारी अनिल नागरे या कर्मचाऱ्याकडून ती जमीन बळकवण्याचा प्रयत्न!



बीड । प्रतिनिधी

गावातील १४० एकर जमीन मंत्रालयातील एका कर्मचाऱ्याकडून बेकायदेशीर ताब्यात घेण्याचा प्रयत्न केल्याने गावकऱ्यांनी तीव्र आंदोलन छेडले. या आंदोलनादरम्यान काही तरुण आणि महिलांनी आत्मदहन करण्याचा इशारा दिला, मात्र पोलिसांच्या तत्परतेमुळे संभाव्य अनर्थ टळला.गावातील तीन महिलांसह पाच तरुणांनी पेट्रोल अंगावर ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. हे तरुण पहाटेच गावातील पाण्याच्या टाकीवर चढले होते, तर खाली गावातील प्रतिष्ठित नागरिक आणि महिलांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. गावकऱ्यांच्या सामूहिक आंदोलनामुळे प्रशासनाला घटनास्थळी धाव घ्यावी लागली.

पान २ वर

# पालकमंत्री अजित पवार उद्या बीड दौऱ्यावर; आ.धनंजय मुंडे हे सोबत दिसणार

## पालकमंत्र्यांच्या दौऱ्यापूर्वी आ.सुरेश धस यांचे खळबळजनक आरोप

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार उद्या बीड दौऱ्यावर येणार आहेत. यावेळी त्यांच्यासोबत मंत्रीपद सोडल्यापासून राजकीय दृष्ट्या फारसे सक्रिय नसलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार धनंजय मुंडे हे देखील उपस्थित



असणार आहेत. मात्र अजित पवार यांच्या दौऱ्यापूर्वी भाजप आमदार सुरेश धस यांनी कृषी खात्यातील भ्रष्टाचारावरून आरोप केले आहेत. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे धनंजय मुंडे यांना आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. मंत्री पद सोड्यापासून धनंजय मुंडे हे राजकारणात फारसे सक्रिय नसल्याचे दिसून आले. तब्येत ठीक नसल्याने डॉक्टरांनी आपल्याला आराम करण्याचा सल्ला दिला असे कारण धनंजय मुंडे यांनी दिले होते.



धनंजय मुंडे हे मागील काही दिवसांपासून परळीतील आपल्या घरी गेले आहेत. मात्र आता ते पुन्हा राजकीय कार्यक्रमात पाहायला मिळणार आहे. पालकमंत्री अजित पवार उद्या बीडच्या दौऱ्यावर येणार आहेत. यावेळी धनंजय मुंडे हे त्यांच्यासोबत असतील असे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते सुरज चव्हाण यांनी सांगितले आहे. धनंजय मुंडे हे गुढीपाडवा निमित्त परळीतील विविध दुकाने आणि रुग्णालयाच्या उद्घाटनासाठी हजर राहिले होते. त्यामुळे ते उद्या होणाऱ्या अजित पवारांच्या दौऱ्या वेळी विविध कार्यक्रमात उपस्थित असतील. ते पुन्हा सक्रिय होऊन पक्ष वाढीसाठी काम करतील असे सुरज चव्हाण यांनी सांगितले.

### अजित पवारांच्या दौऱ्याआधी सुरेश धसांचे आरोप काय?

दरम्यान, अजित पवार यांच्या बीड जिल्हा दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर भाजप आमदार सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांच्यावर आरोप केले आहेत. कृषी विक्री केंद्रात भेसळ झाल्याचे पाहायला मिळत असल्याचे भाजप आमदार सुरेश धस यांनी सांगितले. कृषी खात्यातील अधिकाऱ्यांनी कंपन्या तयार केलेले आहेत. प्रति कंपनी सव्वा दोन लाख ते पाच लाख रुपयांचा मुलीला लाटण्यात आलेला आहे. किरण जाधव यांच्या कालावधीत परवाना घेण्यासाठी तीन लाख रुपयांपासून ३५ लाख रुपयांपर्यंत परवान्याचा रेट लावलेला होता. असा आरो भाजपचे आमदार सुरेश धस यांनी केला.

तत्कालीन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांना खरेदी मधील भ्रष्टाचार शिकवणारे संचालक दिलीप झेंडे, विकास पाटील यांनी किरण जाधव याला नंगानाच करण्याची मोकळीक दिलेली होती. महाराष्ट्रातून परवाना घेण्यासाठी येणाऱ्या प्रत्येक कंपन्याचे कलेक्शन या किरण जाधव कडे केली जात होती असाही आरोप सुरेश धस यांनी केला आहे.

### मागील डीपीडीसी बैठक ठरली होती वादळी

दरम्यान, दोन महिन्यांपूर्वी पालकमंत्री अजित पवार यांच्या उपस्थित बीड जिल्ह्याची डीपीसी बैठक पार पडली होती. या बैठकीच्या आधीही सुरेश धस यांनी बीड जिल्ह्यात ७३ कोटी रुपये बोगस उचलण्यात आल्याचा आरोप केला होता. सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांच्या विरोधातील पुराव्यांचा पेन ड्राईव्ह अजित पवारांकडे दिला होता. याशिवाय या बैठकीत निधी वाटपावर भाजपचे आमदार सुरेश धस, शरद पवार गटाचे खासदार बजरंग सोनवणे आणि मंत्री धनंजय मुंडे यांच्या बाचाबाची झाल्याचा खुलासा केला.



# केज येथे दिवाणी वरिष्ठ स्तर न्यायालयास मंजुरी

## वकील संघाच्या मागणीला यश वकील मंडळी यांनी केला आनंद व्यक्त

केज । प्रतिनिधी

केज येथे दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर तथा अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी न्यायालय स्थापन करण्यास मान्यता मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी केज येथे नवीन दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर तथा अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी हे न्यायालय नव निर्माण करण्यास मान्यता दिली आहे, अशी माहिती केज वकील संघाचे अध्यक्ष जेष्ठ विधीज्ञ श्री.महादेव राव लाड यांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे.

केज येथे जिल्हा अतिरिक्त सत्र न्यायालय कार्यान्वित झाल्यानंतर दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर तथा अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी न्यायालय मंजुरीसाठी केज येथील वकील संघाची मागणी होती याचा विचार करून मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी केज येथे दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर तथा अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी न्यायालयास मंजुरी मिळाली असल्याने आता पाच लाख रुपये व त्याच्या वरील जमीन अधिग्रहण मावेजा, घटस्फोटाची प्रकरणे, मालमत्तेचे वाद, अपघात प्रकरणे, करार विवाद, कौटुंबिक प्रकरणे इत्यादी प्रकरणासाठी इतर न्यायालयात जाण्याची आवश्यकता लागणार नाही अशी माहिती त्यांनी दिली. याचे वकील मंडळी यांनी स्वागत केले असून आनंद व्यक्त केला आहे.

# वरपगाव येथील हर्षवर्धन, रेशमा, रिचा यांनी एमबीबीएस अंतिम वर्ष परीक्षेत मिळवले यश

केज । प्रतिनिधी

संत श्री नागेशपुरी महाराज, संत श्री रामकृष्ण महाराज यांच्या पदस्पर्शानेपावन झालेली वरपगावची भूमी आहे. पूर्वीपासूनच पंचक्रोशी मध्ये गावा तील युवकांनी आपल्या बौद्धिक क्षमता विविध क्षेत्रांमध्ये दाखवलेली आहे. वैद्यकीय क्षेत्रामध्ये राज्याचे प्रतिनिधित्व असो, अध्यात्मिक क्षेत्रात असो,वकील क्षेत्रामध्ये गल्लीपासून दिल्ली पर्यंत गावातील कार्यरत विधीज्ञ असो, तसेच शहरी भागातून संस्थेचे जाळे निर्माण करणारे युवक, व्यवसायामध्ये गरुड भरारी घेणारे व्यावसायिक, नौकरी मध्ये आपली वेगळी छाप सोडणारे नोकरदार असोत, सामाजिक क्षेत्रात काम करणारे समाजसेवक असोत असे विविध क्षेत्रांमध्ये अनेक जणांनी आपला वेगळा ठसा निर्माण केलेला आहे.



नुकत्याच लागलेल्या एमबीबीएस अंतिम वर्ष परीक्षेच्या निकालात गावातील चि.हर्षवर्धन प्रवीण देशमुख, कुमारी रिचा बालासाहेब देशमुख, कु.रेश्मा संतोष देशमुख यांनी विशेष प्राविण्या सह उत्तीर्ण होऊन मोठे यश संपादन केले आहे. वैशिष्ट्यपूर्ण बाबम्हणजे हे तीनही विद्यार्थी यांनी विविध ठिकाणच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात शिक्षण घेतलेले आहे. हर्षवर्धन चे वडील जय भवानी कन्या प्रशाला केज चे मुख्याध्यापक असून रेशमाचे वडील कृषी सेवा केंद्राचे मालक आहेत तसेच रिचा चे वडील स्टेशनरी व्यवसायात आहेत. विविध क्षेत्रात काम करणाऱ्या या पालकांच्या पाल्यांनी उल्लेखनीय संपादन केले आहे. वरील मुलांनी यश मिळवल्यानंतर ग्रामपंचायत वरपगाव गावच्या वतीने उप सरपंच विधीज्ञ बाबुराव देशमुख तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य, सर्व गावकरी यांच्या वतीने विद्यार्थी व पालक यांचे अभिनंदन करण्यात आले. तसेच पुढील कार्यालाशुभेच्छा देण्यात आल्या त्यांनी आपल्या आयुष्यात गोरगरीब जनतेची सेवा करावी अशी अपेक्षा गावातील जाणकार व्यक्तींनी व्यक्त केली.

### जीवाची वाडी येथे गुढी पाडव्या निमित्त कीर्तन

केज । प्रतिनिधी

दि.३० मार्च रविवार रोजी रूढी परंपरेनुसार मूळ जीवाचीवाडी येथील रहिवासी सध्या पंढरपूर येथे कायम वास्तव्यास असणारे ह.भ.प.श्री.कृष्णा भागवत चौरे महाराज पंढरपूर यांचे दि.३० मार्च २०२५ रोजी दुपारी १ ते ३ या वेळेत कीर्तनाचे आयोजन ग्रामस्थ जीवाचीवाडी कर यांनी केले.कीर्तन सेवा रुपी अभंग ।।रूप पाहता लोचनी सुख झाले हो साजणी बहुत सुकृताची जोडी म्हणूनी विठ्ठल आवडी तो हा विठ्ठल बरवा तो हा माधव बरवा सर्वसुखाचे आगर बाप रूखुमा देवी वर।। याअभंगावर तसेच गुढीपाडव्यानिमित्त काला व श्रीकृष्णाच्या खोड्याच्या लिला यांचे विविध दृष्टांत देतकिर्तन संपन्न झाले कार्यक्रमास टाळकरी, विणेकरी, मृदंगाचार्य,गायक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भवानी अर्बन बँकेला १४३.२३ लक्ष रुपयांचा नफा

## माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्याकडून संचालक मंडळाचे कौतुक

गेवराई । प्रतिनिधी

भवानी अर्बन को.ऑप.बँक लि, गेवराई या बँकेला सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात करपूर्व १४३.२३ लक्ष रुपयांचा नफा झालेला आहे. बँकेने या आर्थिक वर्षात डिजिटल आर्थिक व्यवहारावर लक्ष केंद्रीत केले आहे. एटीएम सुविधेसह डेबिट कार्ड, मोबाईल बँकिंग, आयएमपीएस, युपीआय, आधार पेमेंट, नॅच (डीबीटी) आदी सुविधा बँकेच्या ग्राहकांना उपलब्ध करून दिल्या आहेत. माजी आ.अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली सचोटीने पारदर्शक कारभार केल्यामुळे बँकेने ग्राहकांमध्ये विश्वासार्हता निर्माण केली आहे. बँकेला या आर्थिक वर्षात मिळालेल्या यशाबद्दल माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांनी संचालक मंडळाचे कौतुक केले आहे.



भवानी अर्बन को.ऑप.बँक लि, गेवराई या बँकेला सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात करपूर्व १४३.२३ लक्ष रुपयांचा नफा झालेला आहे. बँकेचे भागभांडवल २ कोटी ७६ लक्ष आहे. बँकेचा स्वनिधी ६८६.६७ लक्ष रुपये असून मार्च २०२५ अखेर एकुण ठेवी ७० कोटी ९२ लक्ष रुपये आहेत. बँकेने ३४ कोटी ४८ लक्ष रुपयांचे कर्ज वितरण केले असून ३४ कोटी ९७ लक्ष रुपये बँकेची गुंतवणुक आहे, यापैकी २९ कोटी ७२ लक्ष रुपये सरकारी रोख्यात बँकेने गुंतविले आहेत. बँकेचे खेळते भांडवल ८३६०.०५ लक्ष रुपये आहे, बँकेचे ढोबळ अनुत्पादीत कर्जाचे प्रमाण १.११% असून बँकेचा नेट एनपीए ०.७०% असल्याची माहिती बँकेचे चेअरमन बप्पासाहेब मोटे यांनी दिली.

चेअरमन बप्पासाहेब मोटे पुढे म्हणाले की, माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांनी गेवराई सारख्या ग्रामीण भागात एकोणिस वर्षांपूर्वी ही बँक स्थापन करून ग्रामीण भागातील लोकांना विश्वासार्ह आर्थिक व्यवहाराचे दालन खुले करून दिले. माजी आ.अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली भवानी अर्बन बँकेने सभासद, ग्राहक, खातेदार, कर्जदार व हितचिंतकांच्या सहकार्याने प्रगती केली आहे. बँकेचे संपुर्ण आर्थिक व्यवहार डिजिटल स्वरुपात रुपांतरीत केल्यामुळे ग्राहकांना त्याचा मोठा लाभ होत आहे. बँक ग्राहकांच्या सेवेत एटीएम, डेबिट कार्ड, मोबाईल बँकिंग प, आयएमपीएस, युपीआय, आधार पेमेंट, नॅच (डीबीटी) आदी सुविधा नव्याने सुरु केलेल्या आहेत.

बँकेला मिळालेल्या यशाबद्दल माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांनी संचालक मंडळाचे कौतुक केले. याप्रसंगी बँकेचे चेअरमन बप्पासाहेब मोटे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष ड.राजेश्वर चव्हाण, बप्पासाहेब जाधव, रघुनाथ मोहोळकर, बँकेचे सरव्यवस्थापक भाऊसाहेब नागरे, बीड शाखेचे व्यवस्थापक प्रकाश आमलेकर, माजलगाव शाखेचे व्यवस्थापक मनोज डावकर यांच्यासह बँक कर्मचारी व सभासद उपस्थित होते.

पान १ वरून...

### बीड जिल्ह्यात सहा आमदार दोन खासदार तरीही ठेवीदारांच्या आयुष्याचा अंधार ?

खाजगी बँकेतुन आर्थिक अडचणी येत आहेत त्यामुळे बँके अर्थिक अडचणींवर सापडली असल्याने खातेदारांची चांगलीच तारांबळ होत आहे.खाजगी बँकेत कॅश पुरवठा करण्यास हात आखडता घेतल्याने दर दिवसाला होणारा लाखांवरला व्यवहार हजारांवर आला आहे. यामुळे खातेदारांना चांगलाच मनस्ताप सहन करावा लागत आहे. या बँकेत मुख्य खातेदार व्यापारी व सर्वसामान्य घरातील मोल मजुरी करणारे लोक व असल्याने व आर्थिक व्यवहारातून होणारे होण्यास मोठा अडथळा निर्माण झाला आहे म्हणून बँकेत पैसे असून वेळप्रसंगी मिळत नसल्याने खातेदार व पिग्मी प्रतिनिधी, गोल्डलोन खातेदार व ठेवीदार आर्थिक संकटात सापडले आहे.

यातच ग्राहकांना लागेल तेवढी कॅश मिळत नसल्याने खासगी बँकेचे कर्मचारी व ग्राहक यांच्यात नेहमी तंटे होत आहेत. यामुळे या बँकेचे आर्थिक गणित कोलमडले आहे. त्यातच खातेदारांना वेळेवर पैसे मिळत नसल्यानेखातेदारांची व खास शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती विस्कटली जात आहे.

खाजगी पतसंस्था मल्टीस्टेट निधी अर्बन बँकेचे घोटाळे आणि त्यात ठेवीदारांचे पैसे अडकण्याचे प्रकार काही केल्या थांबत नाहीत. गेल्या वर्षभरात बीड जिल्ह्यात शेकडो ठेवीदारांचे कोट्यवधी रुपये अडकले आहेत. आता यात आणखी बँकाची भर पडत चालली आहे.शहरातील खाजगी पतसंस्थेत व बँकेत गेल्या काही दिवसांपासून ठेवीदार पैशांसाठी सातत्याने चकरा मारत आहेत. मात्र, बँक अधिकारी काही दिवसांतच पैसे मिळतील, अशी आश्वासने देतात चेअरमन महोदय सांगतात की तुमच्या तातडीच्या गरजा भागवण्यासाठी खासगी सावकाराकडून कर्ज काढा, असा अजब सल्ला बँकेचे चेअरमन ठेवीदारांना देत आहेत. या बँकेत मुलांच्या शिक्षणासाठी, लग्नासाठी आणि सेवानिवृत्तीनंतरच्या आयुष्याची तडजोड म्हणून अनेकांनी ठेवी जमा केल्या होत्या. मात्र, मागील काही दिवसापासून खाजगी बँका, नागरी व मल्टीस्टेट, महिला पतसंस्था व ग्रामीण पतसंस्थांना यांनी आर्थिक क्षेत्रात मोठी क्रांती घडवून आणली असे म्हटले जाते. ग्रामीण भागापर्यंत अर्थपुरवठा आणि आर्थिक सोयी उपलब्ध करून दिली आहे परंतु यापेक्षाही अधिक खाजगी बँकेच्या संदर्भात निश्चितपणे विश्वास जोपासत असताना काहींनी आत्ताच उघडलेल्या पतसंस्था महिला अर्बन यांच्या गैरकारभारामुळे लोकांची विश्वासार्हता बुडीत होत चालली आहे. आत्ताच टाकलेल्या पतसंस्था चालकांनी ठेवीदारांचे पैसे उद्योगधंद्यांसाठी वापरले कुणी कारखानदारी, तर कोणी जिनिंग ची दुकानदारी चालू करत पुन्हा बंद करण्याचीही वेळ त्यांच्यावर आली आहे तसेच काही संस्थाचालकांनी आपल्या कुटुंबासह ठेवेदारांच्या पैशावर मौज -मज्जा केली मोठ्या मोठ्या आलिशान गाड्या गळ्यात सोन्याचे लॉकेट, वेगवेगळ्या ठिकाणी प्रॉपर्टी घेऊन ठेवल्या होत्या. तर काहींनी आमिषाला बळी पडून बीड जिल्ह्यातील बुडीत बँक ज्ञानराधा मल्टीस्टेट या संस्थेत २१ टक्क्याने वाढ होईल ही अपेक्षा करून कोट्यवधी रुपये त्या ठिकाणी ठेवले होते. काही संस्था चालकांनी प्लॉटिंगचा धंदा करून ठेवीदारांच्या पैशांचा बाजार मांडलाय. मायबाप जनतेच्या पैशावर माज करणाऱ्या चेअरमन लोकांना कायद्याचा धाकच राहिला नाही. प्रत्येक माणूस कुठल्या ना कुठल्या अडचणीत सापडल्यावर आपण केलेली जमापुंजी ती आपल्याला परत मिळावी यासाठी विश्वासाने बँकेत पैसा जमा करत असतो मात्र अशा गैरकारभारामुळे अनेकांच्या घराचे वाटोळे झाले. अनेकांनी ठेवीदारांचे पैसे बाहेर खाजगी स्वरूपात व्याजाने वाटलें तसेच गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागात एका महिला पतसंस्था चालकाने जारचा प्लॅन ठेविदारांच्या पैशांवर उभा केलेला आहे! याची देखील चौकशी झाली पाहिजे या लोकांनी गोरगरिबांच्या पैशावर मोठे होण्याचे स्वप्न पाहिले मात्र त्यांच्या या अडमुठ्या धोरणामुळे गोरगरीब कष्ट करणाऱ्या लोकांचे मरण आले एका रात्रीत आपण करोडपती होऊ असे स्वप्न बाळगणाऱ्या संस्था चालकावर कारवाई होणे गरजेचे आहे. पालकमंत्री अजितदादा पवार जिल्हा उपनिबंधक सहकारी कार्यालयाकडून या संस्थांना मान्यता मिळते. पण उपनिबंधक सहकारी कार्यालयाकडून या बँकांचा कोणताही आढावा घेतला जात नसल्याने हे प्रकार घडले. बीड जिल्ह्यात अनेक बँकेचे परस्पर सभासद दाखवले जातात. सीए मार्फत राबविण्यात येणारी ही मान्यता थेट रद्द करावी आणि जिल्ह्यात अनेक खाजगी बँकांचे मार्च महिन्यात ऑडिट नसल्याने मोठी अडचण निर्माण झालेली आहे. उपनिबंधक सहकारी कार्यालयातुन या खाजगी बँकेकडे दुर्लक्ष असल्याने ह्या घटना वारंवार घडत आहेत त्यामुळे दर तीन महिन्याला सर्व बँकांचे बॅलन्सशीट तपासणी केल्यास खाजगी संस्था धोक्यात येणार नाहीत. संस्थाचालकाचा मनमानी कारभार जिल्हा प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन थांबवला पाहिजे पालकमंत्री या नात्याने दादा बीड जिल्ह्याची जबाबदारी आपल्याकडे असून पालकत्व स्वीकारून या गोरगरीब मायबाप जनतेला दिलासा मिळावा असा निर्णय घ्यावा आणि अडचणीत सापडलेल्या खाजगी बँकांवर चेअरमन व संचालक मंडळावर तात्काळ कारवाई करून कष्टकरी मायबाप खातेदारांचे पैसे परत मिळावुन द्यावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे

**खाजगी बँक चालकांच्या सातबारावर बोजा चढवा!**

बीड जिल्हा उपनिबंधक सहकारी कार्यालयाकडून नव्याने खाजगी बँक चालकांना मान्यता देण्यात येते. सीए व दलालामार्फत मल्टी सर्विस व सीएससी यांच्याकडून वेगवेगळ्या शासकीय कामासाठी आलेले आधार कार्ड घेऊन परस्पर सभासद केले जातात त्या सभासदांना कुठलीही माहिती नसताना आपण ह्या बँकेचे सभासद केव्हा झालोत असा प्रश्न निर्माण होतो. बँक चालकाच्या गैरकारभाराला आळा घालण्यासाठी संचालक मंडळासह त्यांच्या प्रॉपर्टीवर बोजा टाकणे हा पर्याय उपनिबंधक कार्यालयाला आहे त्यामुळे संबंधित खातेदार व ठेवीदार अडचणीत सापडणार नाहीत आणि त्यांनी जमा केलेली रक्कम त्यांना परत मिळेलही त्यामुळे शासनाने हा निर्णय घ्यावा.


### दरडवाडीतील १४० एकर जमीन हडपण्याच्या प्रयत्नाविरोधात गावकऱ्यांचे आंदोलन

याबद्दल मिळालेली अधिक माहिती अशी की, गावातील कुलकर्णी नामक व्यक्तींनी अनेक वर्षांपूर्वी ही १४० एकर जमीन गावकऱ्यांसाठी दान केली होती. गावकरी ही जमीन गुरे-ढोरे चरण्यासाठी वापरत होते. मात्र, मंत्रालयातील कर्मचारी अनिल नांगरे यांनी या जमिनीवर बेकायदेशीर ताबा मिळवून ती विकण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे.

गावकऱ्यांनी या अन्यायाविरोधात आवाज उठवत सामुदायिक आत्मदहनाचा इशारा दिला होता. त्यामुळे तहसीलदार आणि पोलिसांनी घटनास्थळी हजर होत गावकऱ्यांना लेखी आश्वासन दिले. तहसीलदारांनी सर्वांसमक्ष कबूल केले की, ही जमीन कुणालाही वैयक्तिक स्वरूपात विक्रीसाठी दिली जाणार नाही. पोलीस आणि प्रशासनाची तत्परता गावात रायमोहा व शिरूर पाटोदा पोलीस सकाळपासूनच तैनात करण्यात आले होते. गावकऱ्यांचे आंदोलन मोठ्या प्रमाणावर उग्र होण्याची शक्यता असल्याने पोलीस सतर्क होते. प्रशासनाच्या लेखी हमीपत्रानंतर गावकऱ्यांनी आंदोलन मागे घेतले. या आंदोलनात २०० हून अधिक नागरिकांनी सहभाग नोंदवला होता, ज्यामध्ये महिलांची संख्या लक्षणीय होती.या घटनेमुळे प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, गावकऱ्यांनी या जमिनीच्या संरक्षणासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

# सय्यद अहाद वसीमचे रमजान महिन्याचे २९ उपवास पूर्ण

बीड । प्रतिनिधी



मुस्लिम धर्माच्या पवित्र रमजान महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या महिन्यात मुस्लिम समाजातील लहान चिमुकल्यांना वगळून इतर सर्वांना रोजा (फर्ज) सक्तीचे असतात. परंतु घरात पालकांचे पाहून हे लहान चिमुकले ही मोठ्यांचे अनुकरण करीत रोजा धरतात. अश्याच प्रकारे बीड येथिल फहीम इनामदार यांचे भाचे व खर्डा येथे स्थायिक असलेले सय्यद वसीम सिकंदर यांचे चिरंजीव सय्यद अहाद वसीम याने आपल्या वयाच्या ९ व्या वर्षी दिवसभर अन्नाचा कण व पाण्याचा एक थेंब न घेता काटेकोरपणे असणारे पवित्र रमजान महिन्याचे २९ उपवास (रोजा) पुर्ण केले, त्याबद्दल नातेवाईकडून व मित्र परिवाराकडून अभिनंदन होत आहे.




तेजस अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड बीड च्या वतीने आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ निमित्ताने आज पाणपोई व बाकडे वाटप उद्घाटन सहकार अधिकारी श्री सांगुळे एस.एस. व दैनिक प्रजापत्राचे संपादक संजय मालानी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. प्रकाश कवठेकर, सचिव रामदास ठोसर सर, पोलीस अधिकारी श्री पवार, संस्थेचे अधिकारी सचिन घिगे, अविनाश मोरे, व्यापारी श्री शेख इकबाल शेख करीम सह आदी उपस्थित होते.

### लिंबागणेश येथे अर्धमसला मस्जिद स्फोट आणि पाचेगाव येथील कानिफनाथ मंदिरावर हिरवे झेंडे फडकवत

# सामाजिक सलोखा बिघडवणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाईसाठी निदर्शने

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील अर्धमसला गावातील मशिदीमध्ये रमजान ईदच्या पुर्वसंध्येला आणि गुढीपाडव्याच्या दिवशी समाजकंटकांनी मस्जिदच्या आतील भागात जिलेटीनच्या कांड्यांनी स्फोट घडवून आणला. स्फोट घडवून आणलेल्या ठिकाणी मोठा खड्डा पडला असून भिंतीला तडे गेले आहेत, खिडक्या, दरवाजे,पंखे तुटून पडले आहेत. या घटनेने जिल्हा हादरला असुन संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे.



या घटनेचा सर्व स्तरातून निषेध होऊ लागला असुन स्फोट घडवुन दोन समाजामध्ये तेढ निर्माण करण्याच्या उद्देशाने पुर्व नियोजित कट करून मुस्लिम समाजाच्या प्रार्थना स्थळाचे नुकसान करत धार्मिक भावना दुखावणाऱ्या समाजकंटकांना कठोरात कठोर शासन करण्यात यावे या मागणीसाठी आज दि.१ एप्रिल मंगळवार रोजी सकाळी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील सर्व समाजबांधवांनी एकत्र येऊन गावाच्या मुख्य प्रवेशद्वारावर स्फोट घडवणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाई करा, हम सब एक है, हिंदू -मुस्लिम भाई भाई अशी घोषणाबाजी करत काळे झेंडे दाखवत तिव्र निदर्शने करण्यात आली.

याचवेळी गेवराई तालुक्यातील पाचेगाव येथील कानिफनाथ मंदिरावर काही लोकांनी हिरवे झेंडे लावून तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. संबंधित प्रकरणात सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागण्याचे निवेदन पोलिस अधीक्षक बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, गृहमंत्री यांना देण्यात आले. यावेळी डॉ.गणेश ढवळे, भिम टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ, सरपंच बालासाहेब जाधव, राजेभाऊ गिरे, बाळकृष्ण थोरात, शेख समीर, लेनाजी गायकवाड, शेख ख्वाजा, संतोष भोसले, गणपत तागड, विक्रांत वाणी, अॅड.गणेश वाणी, बाळासाहेब मुळे, सुदाम मुळे, सय्यद अख्तर, सय्यद फिरोज, सय्यद सलीम, सय्यद नुर, सय्यद अझीम, सय्यद शाकीर, शौकत तांबोळी, शेख सत्तार, आरूण ढवळे, सय्यद रफिक, सय्यद फिरोज, उस्मान तांबोळी, शेख वसीम, शेख बबलु, शेख नाझीम, सय्यद अझीम, सय्यद हबीब, सय्यद ताहेर आदी सहभागी होते.



## अंबाजोगाईत रमजान ईद उत्साहात साजरी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरांसह तालुक्यात रमजान ईद मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. रमजानमध्ये महिनाभर मुस्लिम बांधव उपवास करतात. दहा उपवासा दरम्यान सर्वत्र इफ्तार पार्टीचे आयोजन केले जाते. या काळात कपडे, सोने, सुकामेवा खरेदीसाठी बाजारात ग्राहकांची झुंबड होती. यंदा रमजान महिन्याच्या निमित्ताने शहरातील बाजारात महिन्याभरात लाखो रुपयांची उलाढाल झाल्याचे सांगण्यात आले. ईदगाह मैदानावर सामुदायिक नमाज अदा करण्यात आली. ईद सणाच्या अनुषंगाने सकाळी शहरातील ईदगाह मैदानावर सामुदायिक नमाज अदा करण्यात आली. त्यानंतर मशीदच्या इमामकडून सामुदायिक प्रार्थना करण्यात आली. प्रार्थनेनंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना आलिंगन देत ईदच्या शुभेच्छा दिल्या.

शहरातील ईदची ही परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून चालू आहे. रमजान ईदच्या दिवशी हिंदू -मुस्लिम बांधव एकत्रित येऊन सामाजिक सलोखा जपत मोठ्या उत्साहात ईद साजरी करतात. शहरातील ईदगाह मैदानावर माजी आ. पृथ्वीराज साठे,मा. नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. नंतर मुस्लिम बांधवांच्या निवासस्थानी जाऊन ईदच्या शुभेच्छा देत सर्वांनीच शिरखुर्मा, अल्पोपहार याचा आस्वाद घेतला.

## एकलिंगेश्वराच्या अमृत महोत्सवात ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांचे कीर्तन !

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील पाडळशिंगी येथे एकलिंगेश्वर संस्थान आयोजित 'नाचू कीर्तनाचे रंगी' कीर्तन महोत्सवातील दुसरे पुष्प बुधवारी (ता.२ एप्रिल) प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प हिंदू केशरी श्री.समाधान महाराज शर्मा (बीड) पाडळशिंगी येथे अध्यात्मिक किर्तन गुंफणार आहेत. मंदिराच्या प्रांगणात बुधवारी रात्री ९ते ११ या वेळेत हा कीर्तन होणार आहे.



या निमित्ताने एकलिंगेश्वराच्या परिसरातील अमृत महोत्सव वैष्णवांचा मोठा मेळा भरणार आहे. परिसरातील नागरिक, वारकरी संप्रदायातील मंडळी, प्रवचनकार, कीर्तनकार तसेच सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शिक्षण, उद्योग, सहकार आदी विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. तरी हिंदू केशरी भागवताचार्य ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांचे कीर्तन ऐकण्याचा भाविक-भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन युवा उद्योजक श्री. मगन दायमा, लोकनियुक्त युवा पत्रकार श्री.शुभम घोडके यांनी केले आहे.

## बळीराजाचे आर्थिक जीवन भाजपच्या केंद्र व राज्यातील सरकारने उद्ध्वस्त केले : वसंत मुंडे

बीड । प्रतिनिधी

केंद्रात व राज्यात आरएसएसच्या विचार धारेचे भारतीय जनता पार्टीचे सरकार सत्तेवर असून संपूर्णपणे शेती मालाचे भाव हमीभावा पेक्षा कमी करून शेतकऱ्याला आर्थिक कोंडीत टाकून बळीराजाचे स्वप्न उत्पन्न दुप्पट करण्याचे देखावा करून शेतकरी आर्थिक संकटात अडकविण्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला.

आपल्या देशामध्ये खरीप रब्बीचे शेतातील उत्पन्न तयार झाले की परदेशातून सर्व प्रकारचा शेतीमाल ठराविक टक्केवारी देणाऱ्या व्यापाऱ्या मार्फत मागवून घेऊन संपूर्ण देशातील शेतकऱ्याच्या शेती मालाचे भाव पाडून शेतकऱ्याचे जीवन उध्वस्त करण्याचा आरएसएस विचारधारे च्या केंद्रात वराज्यातील सरकारचा अजेंडा आहे. शेतीमाल परदेशातून आयात करताना आर एस एस बीजेपीच्या व्यापाऱ्याकडून अमेरिका, ब्राझील, अर्जेंटिना, चीन या देशात सोयाबीनचे उत्पन्न मोठ्या प्रमाणा वर होते. भारत देशातील सोयाबीनची मागणी व पुरवठा आणि उपभोग या घटकांमध्ये होणाऱ्या बदलाचा परिणाम सोयाबीनच्या, कापूस इतर शेतीमालाच्या किंमतीवर होत असतो. सरकारच्या चुकीच्या आयात निर्यात धोरणा मुळे शेतीमालाचे भाव नसल्यामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या चिंताग्रस्त असून संपूर्ण शेतीमाला ला योग्य भाव मिळत नसल्यामुळे शेतकऱ्या पुढे आर्थिक संकट उभे राहत असल्यामुळे आत्महत्या वाढत आहेत.



शेतकऱ्याच्या दैनंदिन कुटुंबाचा खर्च भागवणे अडचणीचे झाले आहे. तरीही केंद्र व राज्य सरकारला काहीही देणे घेणे नाही. एकीकडे शेतीमधील खते, बी-बियाणे, कीटकनाशक, औषधी ट्रॅक्टर खर्च, खुरपणी, फवारणी, मळणी यंत्र मजुरी, दैनंदिन खर्च वाढल्यामुळे व शेती मालाला भाव नसल्या मुळे शेती परवडत नाही उत्पादनातून खर्चनिघणे शक्य नाही, त्यामुळे सर्व बाजूने शेतकऱ्याला शासनाने आधार देणे काळाची गरज आहे. शासनाचे बाजारपेठेवर नियंत्रण नाही. हमीभावा पेक्षा कमी भावाने शेतकऱ्याचा शेतीमाल बाजारपेठेतून खरेदी केला जात आहे. शासनाकडून कोणतीही कारवाई केली जात नाही. शासनाकडून आधारभूत किंमत शेती मालाला मिळत नाही. अतिवृष्टी दुष्काळ पिक विमा विविध योजनांचे अनुदान आज तागायत शेतकऱ्याच्या खात्यात वर्ग केलेले नाही. निष्क्रिय केंद्र व राज्या तील सरकार शेतकऱ्याला संपवण्याचे षडयंत्र रचित असल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला आहे.

## राजवर्धन बाळू उगले महाराष्ट्रात तेरावा क्रमांक

रायमोहा । प्रतिनिधी

नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षा मध्ये कोणत्याही गैरप्रकारला बळी न जाता, मेहनतीच्या, अभ्यासाच्या जीवावर राजवर्धन उगले इयत्ता सहावी न्यू स्वामी समर्थ इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी ने बंटी सर उगलमुगले ह्यांच्या मार्गदर्शनाखाली,राज्यात तेरावा क्रमांक पटकवला आहे. प्रत्येक वर्षी शिरूर तालुक्यातील विद्यार्थी जिल्ह्याच्या यादीमध्ये दिसत होती, बंटी सरांचे विद्यार्थी महाराष्ट्राच्या यादीमध्ये यावेत हे त्यांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण करून दाखवले. ह्या वर्षी महाराष्ट्रच्या यादीमध्ये सुध्दा विद्यार्थांनी नाव लौकीक केले आहे.



राजवर्धन उगले ह्या विद्यार्थिला, न्यू स्वामी समर्थ इंग्लिश स्कूल चे संचालक डॉ. राजेश तांदळे, मुख्याध्यापक मोहिनी तांदळे, ढवळे सर, उगलमुगले सर तसेच सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी ह्यांनी शुभेच्छा दिल्या.



आज पवित्र रमजान ईद निमित्ताने सिरसाळा येथे पंचायत समितीचे मा. उपसभापती जानिमियाँ कुरेशी साहाब यांच्या निवासस्थानी भेट देऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, पंचायत समितीचे मा. सभापती बालाजी मुंडे, पंचायत समितीचे सदस्य माऊली मुंडे, वैजनाथ चाटे, अजय बळवंत, शिवा फड, आदिनाथ आघाव, सिराज कुरेशी,फय्याज कुरेशी, पत्रकार दत्ता कराड, महादेव गित्ते व आदी उपस्थित होते.

## डॉ.प्रशांत सानप म्हणजे आरोग्य सेवा तेवत ठेवणारा रुग्णसेवक

बीड । प्रतिनिधी

रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा याचे ज्वलंत उदाहरण मध्ये डॉ. प्रशांत सानप, वंजारवाडी ता.शिरूर या छोट्याशा गावातून येऊन आपले वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून, साईबाबा हॉस्पिटल च्या माध्यमातून डॉ.प्रशांत सानप यांची अविरत रुग्ण सेवा चालू आहे, सानप सर हे अस्थिरोग तज्ञ असून आत्तापर्यंत त्यांनी अनेक मोडलेल्या हाडांना जोडण्याचे काम केलेलं आहे, साईबाबा हॉस्पिटल च्या माध्यमातून गोरगरीब व गरजू रुग्णांच्या आतापर्यंत हजारो शस्त्रक्रिया अल्प दरात करून दिल्या आहेत, रुग्णाच्या मनातील आनंद हीच त्यांची आयुष्यभराची कमाई सांगून जातो. आलेल्या रुग्णांकडुन व त्यांच्या नात्यांकडून यांच्या वैद्यकीय सेवे बाबत सदैव कौतुक होत राहते..



आपणास उदंड आयुष्याच्या अनंत शुभेच्छा डॉ.प्रशांत सानप साहेब - रुग्णसेवक शरद झोडगे ( ग्रा.पं. सदस्य तथा उपजिल्हाप्रमुख शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, बाजीराव दादा चव्हाण मित्रपरिवार)



दिनांक ०२ मार्च २०२५ पासून इस्लाम धर्मातील सर्वात पवित्र महिना रमज़ान सुरू झाला होता. आणि दिनांक ३० मार्च २०२५ रोजी मग़रीब नमाज़ नंतर थोड्यावेळाने चंद्र दिसल्याचे जाहीर झाल्यानंतर दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी रमज़ान ईद मुस्लिम बांधव स्वधर्मीयांसह इतर सर्व जाती धर्मातील बंधू-भगिनींसोबत मिळून साजरी केली. परंतु तत्पूर्वी रमज़ान ईद ची ओळख असलेले शीरखुर्मा हे खाद्य पेय बनविण्यासाठी अत्यंत आवश्यक असलेले दूध लागते ते घेण्यासाठी मुस्लिम बंधू-भगिनी जेव्हा बाजारात आले तेव्हा ठीकठिकाणी आपापले मोठमोठे टँकर्स घेऊन दूध विक्रेते दूध विकत होते.

## करणार काय? सांगणार कुणाला?

काही वर्षांपूर्वी शासन चालवीत असलेल्या शासकीय दूध डेअऱ्यांमधून दुधाचे टँकर यायचे. त्या दुधाचे दरही सर्वसामान्य गोरगरिबांना परवडेल आणि दैनंदिन जीवन जगत असताना मिळणाऱ्या दुधाच्या दरापेक्षा त्या दुधाचे दर हमखास कमी असायचे. परंतु शासन-प्रशासनाच्या अनास्थेमुळे तसेच योग्य नियोजनाच्या अभावामुळे शासकीय दूध डेअऱ्यांना टाळे लागले आणि मग तिथून सुरू झाल्या खाजगी व्यापाऱ्यांच्या दूध डेअऱ्या. एरवी उच्चभ्रू, काही प्रमाणात मध्यमवर्गीय आणि चहाचा व्यवसाय करणारे हॉटेल चालक वगळता सर्वसामान्य गोरगरीब या खाजगी दूध डेअऱ्यांच्या दुधाकडे ढुंकणही पाहत नाही परंतु रमज़ान ईद साजरी करण्यासाठी शीरखुर्मा बनविण्याकरिता दुधाची मागणी वाढते आणि मागणीप्रमाणे दूध उत्पादक असलेल्या शेतकऱ्यांकडून चांगल्या प्रतीचे दूध हवे त्या प्रमाणात मिळत नसल्याने नाविलाजास्तव लोकांना या खाजगी दूध डेअऱ्यांच्या टँकर वाल्यांकडून दूध घ्यावे लागते.

कालही या खाजगी दूध डेअऱ्यांच्या टँकर वाल्यांकडून ठीकठिकाणी लाईनीत उभे राहून लोकांना दूध घ्यावे लागले. खाजगी डेअऱ्यांवाले याला दूध म्हणत असल्याने घेणाऱ्यांनीही दूध म्हणून ते ६० साठ रुपये प्रति लिटर प्रमाणे विकत घेतले. आता प्रश्न पडतो की, जेव्हा हे खाजगी दूध डेअऱ्यांवाले लोकांना ६० रुपये प्रति लिटर प्रमाणे जे दूध विकत होते ते खरेच हे शेतकऱ्यांकडून एवढ्या मोठ्या दराने विकत घेतात का? तर याचे उत्तर नाही असेच आहे. शिवाय एवढ्या महाग दराने घेतलेले दूध कसे आहे तर त्याच्यात ना दुधाचा गंध, ना घट्टपणा, ना त्याच्यावर साय येण्याचा पत्ता, माप घेताना फक्त पाण्याचे बुडबुडे आलेले पाहून हे दूध कमी आणि पांढरे पाणी जास्त असा सगळा प्रकार होता. या दुधापासून बनविण्यात येणारा शीरखुर्मा एवढा सपक बनतो की, त्याच्यात दुधाची चवच नसते. शीरखुर्मा तयार करताना या दुधात महाग मोलाचा सुकामेवा ज्यात काजू, बदाम, पिस्ता, अक्रोड, चारोळी, खारीक, मनूके, खवा, गावरान तूप, खोबरे, साखर अशा अनेक वस्तू टाकून बनविला जातो.



एस.एम.युसुफ (मुक्त पत्रकार)

आसेफ़नगर, बीड, ९०२१ ०२ ३१२१

दुधाच्या मानाने या सर्व वस्तूंची किंमत ही अनेक पटींनी जास्त असते. असे असूनही अनेक पट खर्च करून जो शीरखुर्मा बनविला जातो, त्यात मुळात सपक दूध म्हणजेच पांढरे पाणी असते. यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणात खर्च करून ही शीरखुर्मा बनविणाऱ्यांसह तो ग्रहण करणाऱ्यांनाही मानसिक आणि चवदार समाधान मिळत नाही. मात्र शीरखुर्मा बनविण्याची वर्षानुवर्षांपासून चालत आलेली रीत आणि ईद साजरा करण्याचा आनंद यामुळे मुस्लिम बांधवांना हे निकृष्ट आणि सपक दूध खरेदी करावेच लागते.

जर हे दूध घेतले नाही तर दूध दुभत्याचा व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्याकडून सुद्धा दर्जेदार दूध मिळत नाही. यामुळे मुस्लिम बंधू-भगिनींनी खाजगी दुध डेअऱ्यांकडून आलेल्या टँकर वाल्यांकडून खरेदी केलेल्या सपक आणि बेचव दुधाला पाहून अनायासे मजबूरी का नाम महात्मा गांधी असेच म्हणावे लागते. परंतु हे सगळं सांगणार कुणाला? आणि करणार काय? असे प्रश्न निश्चितपणे या अनुषंगाने उपस्थित होतात. अन् ही अवस्था दिवसेंदिवस शासन प्रत्येक क्षेत्राचे करत असलेल्या खाजगीकरणामुळे होत आहे. याला शासकीय दूध डेअऱ्या बंद करून खाजगी दूध डेअऱ्या सुरू करण्याचे धोरणही अपवाद नाही.

# मुंडे बहिण-भावासारखीच अजित पवारांची कामाची पद्धत असल्याने बीडमध्ये शेतकरी आत्महत्या वाढल्या

## शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांचा आरोप

अंबाजोगाई । प्रतिनिधी



सन २०१४ ते २०२४ या दहा वर्षाच्या काळात पंकजाताई मुंडे आणि धनंजय मुंडे हे बहिण भाऊ पालकमंत्री होते.त्यांच्या काळात २४३२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. तर अजित पवारांच्या पहिल्या शंभर दिवसात सुमारे ७५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. मुंडे बहिण–भाऊ गुन्हेगार आणि गुत्तेदारांना अभय देत होते. त्याच पध्दतीने अजित पवारांची वाटचाल असल्याने शेतकरी आत्महत्या रोखण्यात अपयशी ठरले आहेत. अशी टीका शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष, तथा भारतीय किसान संघ–परिसंघ नवी दिल्लीचे सचिव कालिदास आपेट यांनी केली.

### ऊस, दुधाचे पैसे थकीत...

एफआरआयचा कायदा झाल्यापासून साखर कारखानदारांनी ऊसाचा पहिला हप्ता १४ दिवसात देणे बंद केले आहे. साखर कारखाने बंद होऊन महिना उलटला तरी अजून पहिला हप्ता मिळत नाही. मागिल दहा वर्षांत ऊसाचे अंतिम बील दिलेले शेतकऱ्यांना माहित नाही. दुधाचे पैसे दर हप्त्याला दिले जात नाहीत. शासनाने जाहीर केलेले दुध अनुदान प्रति लिटर ५/– रुपये मिळालेले नाही. जिल्ह्यात दुध माफियांना मोकळे रान मिळाले आहे. नकली दुधाच्या नकली कारवाईची सकाळी आलेली बातमी सध्याकाळी विरुन जाते. शेतकऱ्यांचे कोट्यावधी रुपये दुध संकलन करणारांनी थकविले आहेत. ऊस, दुधाचे पैसे थकीत असल्याची तक्रार कुणी ऐकूनही घेत नाही. गोवंश हत्याबंदी कायद्यामुळे मारक्या, बसक्या, भाकड जनावरांना गिऱ्हाईक राहिले नाही. अनेक दुध उत्पादक यामुळे उध्वस्त झाले असून कर्ज बाजारी झाले आहेत.

### शेतकऱ्यांना अपूरा कर्जपुरवठा

ऊस वगळता सर्व पिकांचा स्केल ऑफ फायनान्स ठरविताना जिल्हाधिकाऱ्यांनी हात आखडता घेतला आहे. सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, हरभरा, गहू या पिकासाठी मोठी रक्कम खर्च होत असतानाही बँका पूरेसे कर्ज देत नाहीत. ऊसाला हेक्टरी १ लाख २० हजाराचे कर्ज उपलब्ध आहे. सोयाबीन, कापूस, तूर आदी. पिकांना हेक्टरी केवळ ५५ हजार रुपये पीककर्ज दिले जाते. उद्धव ठाकरे सरकारने दिलेल्या २ लाखाच्या कर्जमाफीनंतर राष्ट्रीयीकृत, ग्रामीण,खाजगी बँका पाच वर्षाच्या परतफेडीची फाईल करीत असल्याने दरवर्षी फक्त कर्जाचे 'नवे–जुने' केले जाते. यामुळे शेतकऱ्यांना पुरेसा कर्ज पुरवठा होत नाही. जमिनीच्या रेडी रेकनर प्रमाणे कर्ज दिल्यास शेतकऱ्यांना शैक्षणिक, सोनेतारण आदी प्रकारचे कर्ज घ्यावे लागणार नाही. बिगरशेती, नागरी पतसंस्था, नागरी सहकारी बँका, मल्टी स्टेट, अर्बन निधी पतपेढया बेकायदेशीरपणे अव्वाच्या सव्वा व्याज वसुली करीत आहेत. द्वारकादास मंत्री नागरी बँकेने बेकायदेशीर वागण्याच्या सगळ्या मर्यादा ओलांडल्या आहेत. कर्जदारांना जगणे मुश्कील केले आहे. त्याकडे कुणाचेही लक्ष नाही.

### बाजार समित्यातून कत्तल

बीड जिल्ह्यात ११बाजार समित्या आहेत. कडा बाजार समितीत कांद्याची आवक मोठी आहे. मात्र कांदा विकल्यास गोणी परत मिळत नाही. सगळया बाजार समित्यातून शेतीमालाला आधारभूत किंमत देण्याचा कायदा पायदळी तुडवीला जातो. जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, उप निबंधक सहकारी संस्था, जिल्हा कृषी अधिकारी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात. बाजार समितीच्या कायद्यात कलम ३२–ड नुसार शेतकऱ्यांना आधारभूत किंमत मिळवून देण्याची तरतूद आहे. दुर्दैवाने पालकमंत्री, आमदार, खासदार, जिल्हाधिकारी याकडे दुर्लक्ष करतात. सोयाबीन, कापूस पिकाला आधारभूत किंमत न मिळाल्याने शेतकऱ्यांचे हजारो कोटी रुपयांचे नुकसान मागील दहा वर्षात झाले आहे. बाजार समितीत शेतकऱ्यांची खुलेआम कत्तल होत आहे. अजित पवारांनी शेतकऱ्यांची कत्तल करणारांवर कायद्याची जरब बसविणे गरजेचे होते. मात्र मुंडे बहिण भावाप्रमाणे अजित पवारही पालकमंत्री, जिल्हाधिकारी गुत्तेदारांची बीले मिळवून देण्यासाठी काम करीत आहेत.

### बँकांची सक्तीची वसुली

सन २०२४ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टी, शिवसेना उद्धव ठाकरे, शिवसेना एकनाथ शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गट आणि काँग्रेस या प्रमुख राजकीय पक्षांनी शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचे आश्वासन दिले होते. सत्तेवर आलेल्या देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी शेतकऱ्यांना कर्जमुक्ती देणार नाही. अशी अलीकडेच भूमिका घेतली आहे. दरम्यान राष्ट्रीयीकृत, खाजगी, ग्रामीण आणि सहकारी बँकांनी कर्ज वसुलीचा तगादा लावलेला आहे. बँकांचे अधिकारी रात्री अपरात्री पैशासाठी फोन करीत आहेत. कर्ज वसुलीची मागणी करीत आहेत. कर्जदार, जामीनदार यांच्या सेविंग खात्याला होल्ड लावून शेतकऱ्यांची कुचंबना केली जात आहे. घरकुल अनुदान, शेततळे अनुदान, अति पाऊस, दुष्काळी अनुदान, किसान सन्मान निधी, नमो किसान निधी, पीक नुकसान भरपाई पोटी आलेली विम्याची रक्कम अशा वेगवेगळ्या रकमांना बँक अधिकाऱ्यांनी खात्याला होल्ड लावले आहे. शेतकऱ्यांना पैसे मिळू दिले जात नाहीत. एकीकडे बाजार समितीत आधारभूत किंमत सुद्धा मिळत नाही आणि दुसरीकडे बँकेत आलेल्या मदतीच्या रकमाही मिळू दिल्या जात नाहीत. जनावरांना गोवंश हत्या बंदी मुळे गिऱ्हाईक नाही. अशी विचित्र परिस्थिती तयार झाली आहे. केवळ शेतकऱ्यांना त्रास दिला जात आहे. या त्रासाला कंटाळून शेतकरी आत्महत्या करीत आहेत. अजित पवार पालकमंत्री झाल्यास कामाच्या पद्धतीत फरक पडेल असे वाटले होते. दुर्दैवाने तेही मुंडे बहीण–भावा सारखेच वागत आहेत. असे कालिदास आपेट यांनी सांगितले.

# विविध मागण्यांसाठी भिमशक्तीचे रास्ता रोको आंदोलन

## जनसुरक्षा विधेयक रद्द करून शेतकऱ्यांचे सरसकट कर्ज माफ करा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जनसुरक्षा विधेयक रद्द करून शेतकऱ्यांचे सरसकट कर्ज माफ करा यासह एकूण ६ मागण्यांसाठी भिमशक्तीच्या वतीने तालुक्यातील ममदापूर (पाटोदा) या ठिकाणी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. याप्रश्री राज्याच्या मुख्यमंत्र्यांना उपजिल्हाधिकारी यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले. अशी माहिती भिमशक्तीचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष भिमराव सरवदे यांनी दिली.

भिमशक्तीच्या वतीने राज्याच्या मुख्यमंत्र्यांना उपजिल्हाधिकारी यांच्या मार्फत दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, भिमशक्ती संघटनेच्या वतीने बीड जिल्हाप्रमुख डॉ.अमरेंद्र विद्यागर यांच्या सूचनेनुसार सदरील विषयाच्या अनुषंगाने सोमवार दिनांक १ एप्रिल रोजी तालुक्यातील ममदापूर (पाटोदा) या ठिकाणी रास्ता रोको आंदोलन करीत आहोत. मा.मुख्यमंत्री महोदयांना या निवेदनाच्या माध्यमातून नम्र विनंती करतो आहोत की, महाराष्ट्रात मागासवर्गीय, आदिवासी आणि मुस्लिम या तीनही समाज बांधवांवर जो अन्याय, अत्याचार होत आहे, तो थांबवावा. आपल्या पक्षाच्या जाहीरनाम्या मध्ये शेतकऱ्यांच्या कर्जा संबंधी शेतकरी बांधवांचा सरसकट कर्ज माफ करण्याचा मुद्दा आहे. तो शब्द आपण पाळावा, आमच्या मागण्या पुढीलप्रमाणे आहेत. १) सोमनाथ सुर्यवंशी यांची हत्या करणाऱ्या संबंधित पोलीसांवर ३०२ चा गुन्हा नोंद करावा., २) जनसुरक्षा अधिनियम हे विधेयक रद्द करावे, ३) बिहार येथील महाबोधी विहार बौध्दांच्या ताब्यात द्यावे. १९४९ चा कायदा रद्द करावा., ४) शेतकरी बांधवांचे कर्ज सरसकट माफ करावे., ५) एस.सी., एस.टी. देशात घडलेल्या घटनेतील पिडीत परिवारांचे शासनाने तात्काळ पुनर्वसन करावे आणि ६) नागपूर येथील मुस्लिम बांधवांवर अन्याय, अत्याचार करणाऱ्या आरोपीवर कठोर कार्यवाही करण्यात यावी. तेथील मुस्लिम बांधवांचे झालेले नुकसान भरपाई करण्यात यावी. सदरील मागण्यां १० दिवसांमध्ये मान्य नाही झाल्या तर आम्ही संघटनेच्या वतीने जेलभरो आंदोलन करू, याची जबाबदारी शासन प्रशासनावर राहील. निवेदनावर निवेदक भिमराव सरवदे (बीड जिल्हा कार्याध्यक्ष, भिमशक्ती), धीमंत राष्ट्रपाल (बीड जिल्हा संघटक, भिमशक्ती), राजेश वाहुळे (मराठवाडा प्रदेशाध्यक्ष, लोक जनशक्ती पार्टी युवा (र), सुमित आवाडे (अंबाजोगाई तालुकाध्यक्ष, भीमशक्ती) यांच्यासह रत्नदीप सरवदे, आकाश देशमुख, अविनाश उगले, हरिभाऊ सरवदे, अविनाश पाडुळे, संभाजी घोरपडे, लालू शेख, चंद्रकांत यादव, कैलास पाडुळे, गौतम सरवदे, गोविंदराव बापू कदम, परमेश्वर सरवदे, अविनाश पन्हाळे, इलाई शेख आदींसह पंचक्रोशीतील गांवकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# कर्जमुक्ती नाहीच ना तर बीड जिल्ह्यातील शेतकरी तोट्याची नाही तर फायद्याची शेती करणार : राजू गायके

तलवाडा । प्रतिनिधी

विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीच्या वरिष्ठ नेत्याकडून संपूर्ण कर्जमुक्तीच्या आश्वासन देण्यात आले होते. मात्र सरकार स्थापन झाल्यावर सर्व शेतकऱ्यांना अशा लागली होती की येणाऱ्या आर्थिक बजेटमध्ये महायुतीचे सरकार बोलल्याप्रमाणे सरसकट शेतकऱ्यांची कर्जमुक्तीची घोषणा करणार पण महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री माननीय अजित पवार साहेबांनी २८ मार्च रोजी शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करण्याचे लांबच ठेवले पण शेतकऱ्यांना ३१ मार्चच्या आत सर्व शेतकऱ्यांनी आपापले पीक कर्ज बँकेत जाऊन भरावे असा सज्जड दम दिला.

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा .श्री अजित पवार साहेब तुम्ही सांगता शेतकऱ्यांना अनेक योजना दिल्या पण शेतकरी म्हणतो तुमच्या त्या सर्व योजना चुलीत घाला पण आमची कर्जमुक्ती करा परंतु गेल्या अनेक वर्षापासून शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही शेतकरी काबाडकष्ट करून मेहनत करून शेतामध्ये राब राब राबवून एका दाण्याचे हजार दाणे करतो परंतु त्या शेतकऱ्याने पिकवलेल्या मालाला हे सरकार भाव देऊ शकत नसेल तर शेतकरी आत्महत्या करणार नाही तर काय करणार. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने या मायबाप सरकारला विनंती करण्यात येते की जसे आपण पिक विम्याचा असेल किंवा पिक विमा ऑनलाईन तक्रारीची ट्रायल जी घेतली जाते ती बीड जिल्ह्यात घेतली जाते तसंच आपण सांगतो बीड जिल्ह्याचा पॅटर्न हा महाराष्ट्रात राबवा त्याच धर्तीवर बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना एक वर्षासाठी अफू आणि गांजाची शेती करायला लावली तर काय हरकत आहे या पिकांमधून या शेतकऱ्यांना दोन पैसे जास्त मिळाले तर आत्महत्या होणार नाहीत. आपल्या महायुतीच्या काळामध्ये उद्योगपतींचे हजारो लाखो कोटी रुपयांचे कर्ज




माफ करता आले आणि जगाच्या पोशिंद्याला खड्ड्यात घालण्याचं काम सरकार करते सरकार सांगेल तसा शेतकरी वागतोय शेतकरी आपल्या नियमाच्या पलीकडे कधी जात नाही तुमच्या मनावर तोट्याची शेती करतो पण शेतकरी आता तोट्याची शेती करणार नाही तर फायद्याची शेती करणार कारण तुम्हाला कर्जमुकती करायची नसेल तर मग शेतकऱ्यांना अफवा आणि गांजाची शेती करण्यासाठी शेतकऱ्यांना परमिशन द्यावा परंतु परमिशन नाही दिले तरी शेतकरी स्वतः अफवा आणि गांजाची लागवड करणार आहे कारण यापासून शेतकऱ्यांना दोन पैसे जादा मिळाले तर काय हरकत आहे म्हणून शेतकरी आता तोट्याची नाहीतर फायद्याचीच शेती करणार आहे असे आवाहन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री राजू गायके युवा जिल्हाध्यक्ष श्री दिनकर रिंगणे, उप युवा जिल्हाध्यक्ष श्री शेख खिजर, गेवराई तालुक्याचे तालुका अध्यक्ष श्री विलास खिसाडे, युवा नेते श्री नारायण करपे, जयदेव शिंगने, कार्यकर्ते लखन भोसले आदींनी आवाहन केले आहे.

# वाल्मीक कराड व सुदर्शन घुले यांना कारागृहात बेदम मारहाण करण्यात आली अशी बातमी निघाली खोटी

बीड । प्रतिनिधी

संतोष अण्णा देशमुख यांच्या खून प्रकरणात अडकलेले वाल्मीक अण्णा कराड व सुदर्शन घुले यांना बीड जिल्हा कारागृहात बेदम मारहाण करण्यात आली अशी माहिती प्रसारमाध्यमांवर सुरू आहे. परंतु प्रत्यक्षात ही बातमी खोटी निघाली असून त्यांना कोणत्याही प्रकारची मारहाण कारागृहात झालेली नाही.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, बीड जिल्हा कारागृह अटक असलेले सुदीप रावसाहेब सोनवणे व राजेश अशोक वाघमोडे हे दोघे आपापले सर्कल समोर सकाळी ९.१५ ते ९.३० च्या दरम्याने त्यांना लागू असलेल्या सुविधेनुसार नातेवाईक यांना दूरध्वनी करण्यासाठी आले असता एकमेकांकडे पाहून दोघांमध्ये शाब्दिक चकमक होऊन त्यांच्यामध्ये झटापटी होऊ लागली असता वेळीच कर्तव्यावरील कारागृह कर्मचारी झटापटी सोडवत असताना इतर बंदी सर्कल मध्ये धावत आले व गोंधळ व शिवीगाळ करू लागले त्यावेळी कर्तव्यावरील कर्मचारी यांनी परिस्थिती नियंत्रणात आणून दोघांना वेगवेगळे केले व आपापले यार्ड मधील बऱ्याच मध्ये बंदिस्त करण्यात आले सदर घटनेमधील त्या दोघांवर कायदेशीर कारवाई करणे करिता शिवाजीनगर पोलीस स्टेशन बीड येथे तक्रार दाखल करीत आहेत. व सद्यस्थितीत कारागृहात शांतता आहे.

तसेच प्रसार माध्यमांवर वाल्मीक कराड व त्यांचे सहकारी सुदर्शन घुले यांना कारागृहात बेदम मारहाण करण्यात आली अशी माहिती प्रसार माध्यमांवर सुरू आहे. परंतु प्रत्यक्षात बंधी असलेले वाल्मीक कराड व सुदर्शन घुले यांना कोणत्याही प्रकारची मारहाण कारागृहात झालेली नाही अशी माहिती बी. एन. मुलानी बीड जिल्हा कारागृह अधीक्षक यांनी दिली.

# अर्धमसला येथे खा. बजरंग सोनवणे यांची भेट; हिंदू–मुस्लिम बांधवांशी साधला संवाद

## शांतता, सामाजिक सलोखा राखण्याचे केले आवाहन

बीड । प्रतिनिधी

अर्धमसला ता.गेवराई येथील मस्जिदमधे दि.३० मार्च रोजी पहाटे जिलेटीनचा स्फोट झाला. यानंतर पोलीस प्रशासनाने तातडीने दोन आरोपीना ताब्यात घेतले. दरम्यान खा. बजरंग सोनवणे यांनी अर्धमसला येथे भेट देत मस्जिदची पाहणी केली. यावेळी ग्रामस्थांशी संवाद साधत शांतता व सलोखा राखण्याचे आवाहन केले.

अर्धमसला गावात ईद च्या आदल्या दिवशी दोघांनी मिळून पवित्र मस्जिदमधे जिलेटिन कांड्याचा स्फोट केला. स्फोटात मस्जिदला तडे गेले आहेत. दरम्यान ही घटना समजताच खा. बजरंग सोनवणे यांनी अंबाजोगाई तालुक्यातील नियोजित कार्यक्रम बाजूलासारून अर्धमसला गावात जाऊन मस्जिदची पाहणी करून हिंदू– मुस्लिम बांधवांशी संवाद साधला. यावेळी गावातील लोक प्रचंड समजदार आहेत. या ठिकाणी दोन्ही धर्मातील लोकांमधे एकमेकांच्या मनात प्रचंड आदर दिसत आहे. जे कोणी आरोपी आहेत त्यांच्या वर कठोर कारवाई करण्यात यावी यासाठी आपण पोलिस अधीक्षक यांना बोलणार आहोत. हिंदू–मुस्लिम बांधवांचे मोठे सण साजरे केले जात आहेत. हा उत्सव आनंदात साजरा करावा आणि सलोखा कायम ठेवावा असे आवाहन त्यांनी केले. यावेळी मुस्लिम बांधवानी देखील गावात आम्ही कायम एकीने राहत आलो आहोत, आजही आणि उद्याही एकीने राहू असा विश्वास व्यक्त केला. यावेळी माजी आमदार बदामराव पंडित, दत्तात्रय ठोंबरे, निझाम शेख, बाबुराव पोटभरे यांच्यासह ग्रामस्थांची उपस्थिती होती. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्याशी गावात चर्चा करून या स्फोटामागे काय उद्देश होता हे तपासा, अश्या सूचना केल्या.

**'त्याच' मस्जिद मधे खा.सोनवणेंचा इफ्तार**

अर्धमसला गावात ज्या मस्जिदमधे स्फोट झाला त्याच ठिकाणी खासदार बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत हिंदू–मुस्लिम बांधवानी एकत्रीत येत इफ्तार केला. यावेळी माजी आमदार बदामराव पंडित, निजाम शेख, भागवत तावरे यांची उपस्थिती होती.



हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT